सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कराड


विद्यानगर, कराड ता. कराड जि. सातारा ४१५ १२४.

फोन नंबर (02164) 271 462 ई-मेल - gpkarad.dte@gmail.com


जा.क्रं.शातंक/विवि/२५-२६/प्रलंबित अर्ज/शिष्यवृत्ती /रिअप्लाय/ 842 दिनांक 18 MAR 2026

अत्यंत महत्वाचे परिपत्रक- अंतिम दिनांक ३०/०३/२०२६

विषय – शैक्षणिक वर्ष २०१९ ते शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या कालावधीतील शिष्यवृत्ती अर्ज भरणे बाबत व Sent Back केलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज त्वरीत Re-apply करणे बाबत...
( SC/ST/OBC/SBC/VJNT/OPEN व EBC/EWS/ SEBC/ तसेच १)राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना व इतर प्रवर्ग )

संदर्भ – १) मा.सहाय्यक आयुक्त समाजकल्याण , सातारा यांचे पत्र क्रं जा.क्रं. सआसकसा/भासशि/२५-२६/२३१५ दि ११/०९/२०२५.
२) या कार्यालयाचे महत्वाचे पत्र क्रं जा.क्रं.शातंक/विवि/२०२५-२०२६/१८२६ दि १८/०९/२०२५.
३) या कार्यालयाचे महत्वाची सूचना क्रं ११ पत्र क्रं. १८७३ दि २३/०९/२०२५.
४) या कार्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांना केलेले भ्रमनध्वनी..
५) या कार्यालयाचे अत्यंत महत्वाचे सूचना पत्र क्रं १ ते ५
६) संस्थेच्या वर्गखोल्यामध्ये वारंवार दिलेल्या तोंडी सूचना..
७) या कार्यालयास दि ११/०२/२०२६ रोजी प्राप्त झालेली सेंट बॅक टू अॅप्लीकेंट संख्या यादी अन्वये.
८) या कार्यालयाचे अत्यंत महत्वाचे पत्र क्रं.जा.क्रं.शातंक/विवि/प्रलंबित अर्ज/शिष्यवत्ती/रिअप्लाय/३८९. दि०२/०२/२०२६.

वरील संदर्भाकित पत्रानुसार या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०१९ ते शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता सर्व SC/ST/OBC/SBC/VJNT/OPEN व EBC/EWS/ SEBC या प्रवर्गातील तसेच व १) राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगह निर्वाहभत्ता योजना ३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना) व इतर प्रवर्गातील संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज त्वरीत ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरणेबाबत तसेच सदरचे ऑनलाईन भरलेले अर्जातील त्रुटीमूळे त्यांच्या लॉगीनमध्ये Sent Back या अंतर्गत शिष्यवृत्ती अर्ज संस्थेने परत त्यांच्या लॉगीनमध्ये त्रुटीअभावी पाठविले असतील तर सदरचे शिष्यवृत्ती अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन त्वरीत शिष्यवत्ती अर्ज ऑनलाईन पध्दतीने Re-apply करणेचे आहेत असे कळविणेत आले होते. तसेच त्याची ऑनलाईन भरलेल्या अर्जाची व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रंची छायाप्रत विद्यार्थी विभागात जमा करणे बावत वारंवार सूचनाव्दारे तसेच प्रत्यक्ष वर्गामध्ये येवून वारंवार सूचना देण्यात आलेल्या होत्या परंतु बऱ्याच विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत त्यांचे अर्ज ऑनलाईन महाडीबीटी व्दारे भरलेले नाहीत अथवा संबंधित विद्यार्थ्यांनी त्याचे **Sent Back** केलेल्या अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ/त्वरीत **Re-apply** केलेले नाहीत त्यामुळे सदरचे अर्ज त्यांच्या लॉगीनमध्येच प्रलंबित आहेत.

तरी शैक्षणिक वर्ष २०१९ ते शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या कालावधीतील विद्यार्थ्यांनी त्यांचे SC/ST/OBC/SBC/VJNT/OPEN व EBC/EWS/ SEBC या प्रवर्गातील तसेच व १) राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ३) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ) व इतर प्रवर्गातील शिष्यवृत्ती अर्ज त्वरीत दि ३०/०३/२०२६ पर्यंत भरावेत तसेच Sent Back केलेल्या अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज दि **३०/०३/२०२६ पर्यंत** त्वरीत Re-apply करणेचे आहेत व विद्यार्थी विभागाशी त्वरीत कागदपत्रासह संपर्क साधणेचा आहे, अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांचा अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये अर्जातील त्रुटींची पूर्तता न केल्याने अर्ज त्यांच्या लॉगीनमध्येच प्रलंबित राहिल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. तसेच संबंधित विद्यार्थ्यांचा शिष्यवत्ती अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारीही विद्यार्थ्यांची राहील व सदर विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. सुरेश आ. पाटील)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कराड.

प्रत- मुख्य सूचना फलकावर सर्व संबंधित विद्यार्थ्यांना माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत- सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (त्यांनी सदर सूचना संबंधित विद्यार्थ्यांच्या whatsapp ग्रुपवरती पाठवावी.)

प्रत- संगणक विभाग, शा.तं.कराड यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

प्रत- डॉ.एस.व्ही..खवळे, अधि.भौतिकशास्त्र ,तथा संस्था समन्वयक अधिकारी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी , विभाग नियंत्रक विज्ञान विभाग, शा.तं.कराड यांचे मार्फत.